## अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्रमांक ०१ चे शपथेवर बयान सरु

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | सुभाष शामराव बोरकर, |
| माझे वय | :– | ४४ वर्ष, |
| माझा धंदा | :– | शेती व व्यापार, |
| राहणार | :– | शिवणी, ता. सिंदेवाही |

## साक्षीदाराचा सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. सी. आर. भोई यांच्या मार्फत

१) घटना टाळेबंदीच्या काळात सन २०२१ मध्ये घडली. घटना अंदाजे ९ व्या महिण्यात २०२१ मध्ये बाजार चौक, शिवणी येथे घडली होती. मी त्या दिवशी दही व भेंडी विकण्यासाठी तळोधी येथे गेलो होतो. माझ्यासोबत माझी पत्नी व दोन लहान मुलीसुध्दा होत्या. मी दिवसाचे १०.०० ते १०.३० वाजता शिवणी येथे परत आलो. आरोपी संभाजी बोरकर व त्याच्यासोबत चौघेजण असे माझ्या गाडीला बाजार चौकात आडवे झाले. त्यांनी गाडीची चावी काढली. माझी कॉलर पकडली आणि दोराने बांधुन मला मारण्याचा प्रयत्न केला. माझी पत्नी व माझ्या लहान लहान मुली आडव्या येत होत्या. आरोपी माझ्या पत्नीला शिवीगाळ करीत होते व माझ्या मुलींना बाजुला ढकलुन देत होते. त्यानंतर सोडवासोडव झाली. त्यानंतर मी घरी गेलो. माझ्या गालावर आणि पाठीवर मारहाण करण्यात आली होती. मला हाताने मारहाण केली होती. आरोपीच्या हातात लोखंडी रॉड होता परंतु, तो माझ्या पत्नीने बाजुला केला होता. तेथे बराच वेळ आमचा वाद झाला. तो मला व माझ्या पत्नीला शिवीगाळ करीत होता. मी चौघा पाच लोकांच्या तावडीतुन निघुन पोलीस ठाण्यात आलो व तक्रार दिली. आता मला अभिलेखावरील तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २३** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील छापिल प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर

आहे. त्यास **निशाणी क्र. २४** देण्यात येते. मी उल्लेख केलेला दोर मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता साक्षीदाराला सिलबंद न्यायालयीन मुद्देमाल क्र. ०३/२०२६ विद्वान सरकारी विधीज्ञ व आरोपीचे विधीज्ञ श्री. नागदेवते यांच्या समक्ष दाखविण्यात आला. साक्षीदाराने त्याचे अवलोकन करुन सांगितले की, सदर दोर हा तसाच आहे. मी आरोपींना ओळखतो. आज रोजी आरोपी संभाजी बोरकर व एक मेश्राम असे दोन आरोपी आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**(साक्षीदाराचा उलटतपास आरोपीच्या तर्फे विद्वान विधीज्ञ एम. पी. नागदेवते यांच्या मार्फत)**

२) मी घटनेचा दिवस / वार कोणता होता हे सांगु शकत नाही. आरोपीचे माझ्याकडे पैसे होते. साक्षीदार स्वतः सांगतो की, ते मी परत केले.

प्रश्न –घटनेच्या अगोदर वापस केले की नंतर ?

उत्तर –घटनेच्या पुर्वी मी त्यांना दोन तिन वेळा कॉल केला होता, परंतु, ते गावात हजर नसल्यामुळे संपर्क झाला नाही.

३) हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या त्याच दिवशी मी आरोपीला पैसे दिले. मी आरोपीला रक्कम रु.१७,०००/– दिले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी मला पैसे दे असे म्हणुन हटकले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यात आमची ढकलढोप झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी पैसे देत नाही असे म्हणल्यानंतर आमच्यात ढकलढोप झाली होती.

४) हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ ते ५ यांनी मला अडविल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मारहाण केल्याचे व दोराने बांधण्याचा प्रयत्न केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या

पत्नीला शिवीगाळ केली व मुलींना ढकलुन दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा तो दोर नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या विरुध्द तक्रार दाखल करतील या भितीपोटी मी आरोपींच्या विरोधात खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.** **फेरतपास नाही.**

दिनांक ०५/०६/२०२६.

सा.वा.दा.ब.अ.क.के.

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.06.05 16:23:15 +0530

(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिंदेवाही

श्रवणोत्तर स्विकृत,

PANDURANG ANKUSH GHOTE
Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.06.05 16:23:21 +0530

(श्री. पा. अ. घोटे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिंदेवाही